
# 'स्वरूपवर्धिनी

## कार्यवृत्त १९८८



# 'स्व-रूप' वर्धिनी

# कार्यवृत्त

## १९८४

संकलक—शिरीष रामचंद्र पटवर्धन

मुखपृष्ठ व सजावट
श्री. अरुण फडणीस


मुखपृष्ठ कल्पना व काव्य
विद्यार्थी जितेंद्र ज्ञानदेव पवार

# स्व-रूप' वर्धिनी आहे तरी काय ?

- *शिक्षण-संस्कार-सहवास यांचा सुरेख संगम*
- *गुणी विद्यार्थी-व्रती शिक्षक-आणि तळमळीचे निःस्वार्थी कार्यकर्ते यांचा सुंदर मिलाफ*
- *विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकवणारी कार्यशाळा*
- *निराशेचे सावट, उदासीनतेचे मळभ पार पळवून लावणारे उत्साही वातावरण देणारी एक चळवळ.*
- *परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, 'आपली' वाटणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था.*
- *सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त, जोपासणारा उद्याचा एक राष्ट्रीय शिक्षण प्रकल्प.*

आणि,

बरंच काही




*काम सुरू करून पाच वर्षे पूर्ण झाली. या पाच वर्षांत काय मिळवलं असा विचार मनात आला आणि मग लक्षात आलं की युवराज सारखी स्वतःला योग्य रीतीने बदलवणारी मुलं हेच फार मोठं यश आहे. अर्थात यशाचे अजून कितीतरी टप्पे गाठायचे आहेत, आणि त्याचसाठी गाठलेला टप्पा विचारात घ्यायला हवा, नाही का?*

*म्हणूनच हे सिंहावलोकन,*
*१९८४ मधील कार्याचे.*

/ नमस्कार

मी युवराज, वय १८ मी स्वत: अनेक मैदानी खेळ उत्तम खेळू शकतो; तसेच इतरांचे खेळ चांगल्या प्रकारे घेऊही शकतो. धाडसाची कामं तर मला मनापासून आवडतात, आणि त्याहूनही मला अधिक आवडतं इतरांच्या उपयोगी पडणं.


माफ करा. नौकरी हवी म्हणून मी हे सारं सांगतोय असा आपला समज झालाय का? छे, छे! तसं काही नाही बरं का खेळातील कौशल्य, धाडसीपणा, सेवा तत्परता यातलं माझ्यात काहीच नव्हतं. मग आपण म्हणाल हे सारे चांगले गुण माझ्या कसे काय अवतरले? याचं गुपित सांगू? अट एकच — हे गुपित कळल्यावर त्याचा अधिकाधिक प्रसार करायचा. कबूल? मग हळूच पलटा हे पान - - - - - -.

## ='स्व-रूपवर्धिनी'=

होय, हीच ती संस्था जिथे मला सारं मिळालं, आणि आता या गुणांचा मी माझ्या दैनंदिन जीवनात उपयोग करतोय.


युवराज


# विविध उपक्रम




### तिळगूळ समारंभ

मेसर्स वेकफिल्ड इंडियाचे संचालक श्री. मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दिनांक २९/१/८४ रोजी तिळगूळ समारंभ संपन्न झाला. मल्लखांब, आसने, मानवी मनोरे, आणि बोथाटी अशा विविध क्रीडा प्रात्यक्षिकांनी कार्यक्रम सुरू झाला. विविध विषयांमध्ये, कलांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना मा. अध्यक्षांनी बक्षिसे देऊन त्यांना शाबासकी दिली.





### शिक्षक व्हा!


दहावीच्या शालांत परीक्षेस बसणाऱ्या वर्धिनीमधील विद्यार्थ्यांचा शुभेच्छा कार्यक्रम बुधवार दिनांक १४ मार्च रोजी झाला. मार्गदर्शन करण्यासाठी श्री. राजाभाऊ लवळेकर हे आले होते. या पुढील जीवनाचा टप्पा कसा आहे व कसा असावा याचा आढावा घेत त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की व्यक्तिगत आयुष्यात यशस्वी होत असतानाच आपल्या डोळ्यांसमोर लोकमान्य टिळक, आगरकर, डॉ. आंबेडकर यांच्यासारखे समाजाचे खरे शिक्षण करणारे शिक्षक असू द्या. त्यांच्या मार्गावरून पावले टाकली की मग जीवनाचा खरा अर्थ कळेल, आणि खरा आनंद मिळेल..




### उपासना-शक्तीची

१४ एप्रिल 'हनुमानजयंती' शक्तिमान होण्याचा संकल्प करण्याचा सुयोग्य दिवस. पहाटे ५.४५ वाजता विद्यार्थी एकत्र जमले. वयाने लहान असलेल्या गटाने प्रत्येकी १२ सूर्यनमस्कार घातले. मध्यम गटाने एकूण ८०० सूर्यनमस्कार तर मोठ्या गटाने एकूण १००० जोर काढले.





## हे असे का?




या वर्षी साजरी झालेली आंबेडकर जयंती एका वेगळ्याच अनुभवाने महत्त्वाची ठरली. वर्धिनीमधील ११वी-१२वी मधील विद्यार्थ्यांना सांगण्यात आले की ही जयंती यशस्वी करण्याची जबाबदारी संपूर्णपणे तुमची. बघता बघता सर्व जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांनी शिरावर घेतल्या, अगदी स्वागतापासून समारोपापर्यंत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲडव्होकेट बाजीराव कांबळे हे होते. विश्वासने केलेल्या प्रास्ताविकानेच कार्यक्रमाची पकड घेतली. त्यात तो म्हणाला, "नुकताच भारतीय अंतराळवीर राकेश शर्मा अंतराळातून पंतप्रधानांशी बोलताना म्हणाला येथून भारत देश कसा दिसतोय? प्रांताप्रांताच्या सीमासुध्दा दिसत नाहीत. अंतराळातून एक दिसणाऱ्या या देशात मग प्रत्यक्षात भेदभाव का? जातीवरून भेदभाव, प्रांतीय भेदभाव, भाषिक भेदभाव, हे असे का? हे सारे भेदभाव नष्ट करण्याचा संकल्प डॉ. आंबेडकरांचे स्मरण करून आपण करू या."



## राजा हरिश्चंद्रा...तुझा वंश वाढतोय—

कोल्हापूरचा सुनील मोदी. विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता. वक्तृत्व कलेत तरबेज पारितोषिक पटकावणारा, पण स्पर्धांच्या गर्दीत परिषदेच्या अनेक अभ्यास वर्गास उपस्थित राहू शकला नाही. वाईट वाटले. काय करावे ? सुनीलला एक ज्येष्ठ कार्यकर्ता सहज म्हणाला, "त्यात काय ? तुला मिळणाऱ्या बक्षिसांची रक्कम एखाद्या चांगल्या सामाजिक कार्याला देऊन टाक;" आणि खरेच सुनीलने हे व्रत स्वीकारले. नंतर दोन वर्षे विविध स्पर्धा जिंकल्या. बक्षिसांची रोख रक्कम जमली रुपये २०००/- सुनील आता टी.वाय.बी.ए. च्या वर्षास आहे. खरे पाहता पॉकेट मनी मस्त जमलाय. पण त्याने व्रत स्वीकारले आहे. एका सुप्रभाती सुनीलने सारी रक्कम परिषदेच्या त्या ज्येष्ठ कार्यकर्त्याकडे सुपूर्त केली. त्यांनी सांगितले, "ही रक्कम आपण 'स्व-रूप' वर्धिनीस देऊ." म्हणून स्वतः सुनील पुण्याला आला. आणि त्याने ही रक्कम वर्धिनीच्या संचालकांच्या हाती स्वाधीन केली. सुनीलची ही प्रवृत्ती जोपासण्याच्या दृष्टीने त्याचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष श्री. अण्णासाहेब गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला.







## प्यारा तिरंगा

१५ ऑगस्ट रोजी विवेकानंद शाखेवरती दोन्ही शाखांचा स्वातंत्र्यदिनानिमित्त कार्यक्रम साजरा झाला. कार्याध्यक्ष श्री. कृष्णराव पटवर्धन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या मुहूर्तावरच 'स्व-रूप' वर्धिनीच्या हस्तलिखिताची सुरुवात झाली. अध्यक्ष श्री. पु. व. श्रॉफ हेही या कार्यक्रमास उपस्थित होते. विविध स्पर्धांनी रंगलेल्या या कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रीय ध्वजास सलामी देऊन झाला.

## सवाल-जवाबच....लाजवाब

फ्रान्सहून पुण्याला आलेले एक मित्रमंडळ तीन ऑगस्ट रोजी 'स्व-रूप वर्धिनीचे काम पहाण्यास आले. सर्व विद्यार्थांशी त्यांना बोलता यावे म्हणून तीन गटात विध्यार्थ्यांची आणि या विदेशी मित्रमंडळींची विभागणी केली. ५वी-६वी मधील विद्यार्थ्यांनी फ्रेंच मुलांना गाणी म्हणायला लावली, चित्रे काढायला लावली, तर ७वी ते ९वी च्या गटाने फ्रेंच गटास त्यांचा राष्ट्रीय पक्षी, राष्ट्रगीत कोणते अशांसारखे प्रश्न विचारले. १०वी व त्यापुढील इयत्तांमध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गटाशी झालेल्या गप्पा मात्र अधिक रंगल्या कुटुंबव्यवस्था, शिक्षणपध्दती, खेळ यासंबंधी विविध प्रश्न एकमेकांनी विचारले. त्या सर्व प्रश्नांपैकी जितेंद्रने विचारलेला प्रश्न मात्र फ्रेंच गटालाद जरासा 'त्रासदायक' ठरला. त्याने विचारले की इतिहासात आम्ही वाचले आहे की फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व दिले आहे. जर आज आम्ही फ्रान्समध्ये आलो तर यापैकी काय काय आढळेल? दुभाषाकडून प्रश्न कळल्यावर त्या गटाच्या प्रमुख प्राध्यापिका क्षणभर गोंधळल्या आणि मग नंतर मात्र त्यांनी वस्तुस्थिती सांगितली. हे 'सवाल-जबाब' खरोखरीच 'ला-जवाब' झाले.





## तस्मै श्री गुरवे नम:

गुरू पौर्णिमेच्या दिवशी विद्यार्थ्यांनी एकेक गुलाबपुष्प देऊन सर्व उपस्थित शिक्षकांचे पूजन केले. एक सहकारी शिक्षक उपस्थित नव्हते म्हणून काही विद्यार्थी त्यांच्या घरी गेले. गुलाबपुष्प देऊन त्यांना वंदन केले. ते सहकारी शिक्षक आनंदाने गहिवरले.



## राखीपौर्णिमा


विशाल संपर्काचा दिवस. राखी बांधण्याच्या निमित्ताने हजार-दोन हजार लोकांशी ओळख होते. भोवतालच्या लोकांच्या प्रतिक्रिया समजतात, रीती समजतात. नेहमीप्रमाणे गटागटाने विद्यार्थी राखी बांधायला बाहेर पडले. छोटा योगेशही एका गटात होता. एका घरात राखी बांधायला गेला, पण त्या घरातील कुटुंबप्रमुख पिऊन तऽऽर्र होता. तरीही योगेश राखी बांधायला गेला आणि मग राखी बांधण्याऐवजी योगेशला धूम पळावे लागले कारण त्या बाबाने मारण्यासाठी हातात चप्पल घेतली होती. दुसऱ्या एका घरात मात्र योगेशला आलेला अनुभव आनंददायकच होता. त्या घरातील प्रमुखाने राखी बांधून तर घेतलीच पण राखी बांधून झाल्यावर योगेशला पांच रुपये देऊ केले. योगेश म्हणाला छे !छे ! पैसे कशासाठी ? मी तर राखी बांधायला आलोय आणि सर रागावतील ना मला. त्यावर तो प्रमुख म्हणाला अरे राखी बांधून तुला आनंद मिळाला की नाही; मग पैसे देऊन मला जर आनंद मिळणार असेल तर तू का हिरावून घेतोस ? योगेश अर्थातच निरुत्तर झाला. पाच रुपये त्याने स्वीकारले आणि लगेचच दुसऱ्या दिवशी त्यांना पावती नेऊन दिली.

दूरवरच्या औंध इस्पितळातील बालरुग्णांच्या विभागात विवेकानंद शाखेचा एक गट पोहोचला. सारखी औषध, गोळ्या, इंजेक्शन्स् यांना कंटाळलेली तेथील छोटी मंडळी आनंदित झाली कारण त्यांना राखीबरोबरच एक एक चॉकलेटसुध्दा मिळाले.

## वार्षिक नियोजन बैठक

दहा जून रोजी मार्बल हॉल पुणे विद्यापीठ येथे वार्षिक नियोजन बैठक झाली. प्रथम सत्रात गेल्या वर्षीचा आढावा घेण्यात आला. दुसऱ्या सत्रात वर्षभराच्या कामाचे नियोजन करण्यात आले. मा. यशवंतराव लेले यांनी या बैठकीस मार्गदर्शन केले. ३० कार्यकर्ते/शिक्षक या बैठकीस उपस्थित होते. संध्याकाळी या बैठकीस जोडूनच वर्धिनीच्या हितचिंतकांचा चहापानाचा कार्यक्रमही झाला.

या बैठकीप्रमाणेच रविवार दिनांक १७ जून रोजी विद्यार्थी कार्यकर्त्यांचीही अशीच बैठक झाली. गेल्या वर्षी आपण काय काम केले? त्यात स्वतःचे समाधान झाले का? वर्धिनीच्या कामाचे महत्त्व काय? आणि या वर्षी आपण काय जबाबदारी घेणार? अशा चार सत्रात ही बैठक झाली. बत्तीस विद्यार्थी पूर्णवेळ उपस्थित होते. प्रा. शरद वाघ मार्गदर्शन करण्यासाठी पूर्णवेळ उपस्थित होते.



# शिबिरे

## कला शिबिर

स्थळ : आय्.एल्.एस्.लॉ कॉलेज
कालावधी : १ मे ते ८ मे, १९८४
शिबिरार्थी : ६०



मातकाम, पोहणे, प्रथमोपचार, खडू तयार करणे हे विषय शिबिरासाठी होते. मातीच्या वस्तू कशा बनवायच्या याचे मार्गदर्शन करण्यासाठी श्री. चारुदत्त कुलकर्णी हे आले होते. लहान मुलांना मातीत खेळायला मनापासून आवडते. त्यांच्या ह्या आवडीला चांगली दिशा देण्याचा हा प्रयत्न होता. पोहणे शिकवायला श्री. रघुनाथ नरवणे व श्री. शाळीग्राम यांचे सहाय्य लाभले. आरोग्य खात्याकडून डोळे व दात यावरील फिल्मस् उपलब्ध झाल्या. श्रीधरपंत फडके, श्री. अनिलराव गोडबोले, व श्री. उत्तमराव कानिटकर यांनी गोष्टी सांगितल्या ९वी ते १२वी या गटातील विद्यार्थ्यांशी बोलण्यासाठी डॉ. वासुदेव आगटे, श्रीमती शोभनाताई रानडे व श्री. अनंतराव चाफेकर हे आले होते.

## गांधी विचारदर्शन शिबिर

१५ मे ते १७ मे ८४ या कालावधीत ज्ञानप्रबोधिनीतर्फे शिवापूर येथे गांधी विचारदर्शन शिबीर घेण्यात आले. स्वरूपवर्धिनीतील रवींद्र मोदळे, सुनिल सुर्वे आणि कु. वर्षा महाबळेश्वरकर हे तिघेजण या शिबिरात भाग घेण्यासाठी शिवापूरला गेले होते. महात्मा गांधींच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विषयावरील विचारांचा अभ्यास या शिबिरात करण्यात आला.

## महात्मा गांधींच्या बंदिस्थानात...आम्ही (?)




होय. आमचे दिवाळी शिबिर झाले राष्ट्रीय स्मारक (आगाखान पॅलेस) येथे २७ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या कालावधीत. एकूण ११० विद्यार्थी शिबिरास उपस्थित होते. या शिबिराचे विषय होते, "संतांची सामाजिक शिकवण आणि शिव चरित्र."

सर्वश्री शशिकांत मांडके, प्रा. शरद वाघ, नानाराव ढोबळे आणि डॉ. श्रीकांत बहुलकर हे वक्ते होते.

या शिबिरात प्रथमच शिबिराच्या ठिकाणी स्वयंपाक केला होता. त्यामुळे सकाळी उठल्या उठल्या सर्व विद्यार्थी तांदूळ-डाळ निवडायला बसत होते. हे दृश्य पाहून आईवडिलांना धन्यता वाटली असती आणि अर्थातच प्रतिक्रिया आली असती, "घरी इकडची काडी तिकडे करणार नाहीत, लगेच अभ्यासाचे कारण पुढे करतील. ही अशी कामे इथे करायला लागत आहेत

हे बरे झाले; आमच्या कष्टांची जाणीव थोडीतरी होईल.'' या शिबिरात संतचरित्राबरोबरच शिवचरित्रही होते. ते रंगवले प्रा. सुरेशराव परचुरे आणि श्री. प्रदीप आगाशे यांनी. हे चरित्र केवळ युध्दवर्णन करणारे नव्हते तर महाराजांनी माणसे कशी मिळविली, जिंकली हे सांगणारे होते. त्यामुळेच शिवचरित्रातील गोष्टी आवडीने सांगणाऱ्या एका विद्यार्थ्याने प्रतिक्रिया व्यक्त केली, ''मला अजून शिवचरित्राचा अभ्यास खूपच करायला हवाय.''

## वाटचाल - उद्दिष्टांच्या दिशेने



*असे दिव्य तारुण्य रोमी भिनावे । असे शुध्द तारुण्य येथे फुलावे ।*
*असा ध्यास घेऊनी तू लाग कामा । नको वादसंवाद आता रिकामा ।।*


संस्था उभी करायची, काम यशस्वी करायचे ते कोणाच्या बळावर ? त्याला हवा कार्यकर्त्यांचा थवा, ध्यास घेऊन काम करणारा आणि हसतमुख राहणारा. वयाने आणि अनुभवाने श्रेष्ठ असे ५-६ कार्यकर्ते वय विसरून काम करीत आहेतच. पण आता या थव्यात दोन पूर्णवेळ 'तरुण' कार्यकर्त्यांची भर पडली आहे. एक आहेत श्री. शिरीष पटवर्धन, तर दुसऱ्या आहेत कु. बागेश्री गोखले.

**प्रतिबिंब...आदर्शाचे**

सुनील मोदीचा आदर्श समोर ठेवला, आणि काय सांगावे, या आदर्शाची दोन प्रतिबिंबे स्व-रूप वर्धिनीतच आढळली.

रवींद्रने यावर्षी दिवाळीच्या सुट्टीत फटाके विकले. नफा झाला रुपये १६०/- आपल्या वाढदिवसाचे निमित्त साधून रवींद्रने नफ्यातील २५% रक्कम घरच्यांच्या संमतीने वर्धिनीस अर्पण केली.

दीपकला दिवाळीच्या दरम्यान एका संस्थेमार्फत ५००/- रुपये आर्थिक मदत मिळाली. रक्कम मिळताच, त्याच क्षणी स्वतःहून दीपक म्हणाला, ''सर, या रकमेतील १००/- रुपये अन्य गरजू मुलांसाठी खर्च करण्यासाठी घ्या, कारण माझ्यापेक्षाही जास्त आवश्यकता असणारी काही मुले येथे आहेत.''



**शाब्बास चंद्रकांत, शाब्बास विश्वास, जितेंद्र...ब्रेव्हो**




यंदा दहावीच्या परीक्षेस अकरा विद्यार्थी बसले होते. यापैकी ६ जणांना ७५% ते ८५% गुण प्राप्त झाले. परंतु यावेळचे खरे आकर्षण होते चंद्रकांत भोसले याचे. चंद्रकांत हा अंध विद्यार्थी १० वीच्या परीक्षेस बसणार होता. संपूर्ण वर्षभर त्याचा अभ्यास करवून घेण्याची व त्याला शिकविण्याची जबाबदारी घेतली होती विश्वासने. विश्वास हा येथील दहावीच्या पहिल्या तुकडीत ८९% गुण मिळवून पहिला आलेला विद्यार्थी. त्याने चंद्रकांतचा सातत्याने रोज वर्षभर सर्व विषयांचा अभ्यास त्याच्या घरी जाऊन करवून घेतला. परिणाम... चंद्रकांत ७१% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.

तर इकडे ८५% गुण मिळवून २ ऱ्या तुकडीत पहिला आलेला जितेंद्रही शांत बसला नव्हता. आपल्या अभ्यासाबरोबरच त्याने त्याच्या शाळेतील एका आत्मविश्वास हरविलेल्या मित्राला सहाय्य केले. अभ्यास कसा करावा हे दाखविले. आणि शाळा सोडून देण्याच्या मनःस्थितीमधील तो मुलगा जितेंद्रने योग्य वेळी दिलेल्या आधारामुळे पास झाला. या सर्व गुणी विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा कार्यवाह श्री. देसाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.






**सर्वेक्षणातील काही क्षणचित्रे**

स्वरूपवर्धिनीने जी जागा विकत घेतली आहे त्याचे समोर असलेल्या वस्तीमधील लोकांसाठी आरोग्य सेवा केंद्र सुरू करता येईल का याचा अंदाज घेण्यासाठी एक सर्वेक्षण घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गटांनी वस्तीत फिरून घराघरातून माहिती गोळा केली. जवळ जवळ १६० कुटुंबातील ८०० लोकांची माहिती विद्यार्थ्यांनी गोळा केली. या पहाणीत शिकलेल्यांपेक्षा अशिक्षित अर्थातच अधिक आणि त्यात शाळेत न जाणाऱ्या मुलांचे प्रमाण त्याहूनही अधिक असल्याचे आढळले.


मुलाला शाळेत न धाडण्याची अनेक कारणे असतात. परंतु एक धक्कादायक नवीन कारण या सर्वेक्षणात आढळले. एका बाईचा ७ वर्षाचा मुलगा शाळेत जात नव्हता. अधिक चौकशी केल्यावर कळले की, या मुलाचा जन्म त्या झोपडीतच झाला होता आणि आईवडिलांना मुलाचा जन्मदाखला ताबडतोब मिळविण्याचे सुचलेच नाही, कारण स्वतः अडाणी. अडाणीपणाचे हे परिणाम मुलांना भोवतात. आरोग्याच्या बाबतीत तर काय साराच आनंद.

**मने ओढुनी घ्यावया बांधवांची, असो शक्ति अंगात आकर्षणाची ।**
**अशा शक्ति-वक्तृत्व-विद्या-कलांना, त्वरे सश्रमे घेइ तू आकलोनी**


लोकांना आपल्याकडे आकृष्ट करून घ्यायला लोकात जशी मिसळण्याची सवय हवी तसे उत्तम प्रभावी वक्तृत्वही हवे. ही शक्ति वाढविण्याचा प्रयत्न या वर्षी सुरू झाला. दोन ऑगस्ट रोजी शेठ हिरालाल सराफ प्रशालेत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसमोर लोकमान्य टिळकांच्या जीवनातील काही प्रसंग सांगण्यासाठी संजय तांबट, गणेश राऊत, ज्ञानेश पुरंदरे, अवधूत फडणीस, जितेंद्र पवार आणि शिरीष पटवर्धन हे गेले होते. सुरुवात तर नक्कीच उत्साह वाढवणारी झाली आहे. आता आणखी मोठा टप्पा गाठायला हरकत नाही.



## राजा, तू मोठा साहेब होशील रे!



गोरगरीब, अडीअडचणीत असलेले, आजारी, घराला किंवा आईवडिलांच्या प्रेमाला पारखे असलेले अशांच्या दुःखाची जाणीव व्हावी, त्यांच्याविषयी आपलेपणा वाढावा म्हणून येथील विद्यार्थी दरवर्षी दिवाळीच्या पहिल्या दिवशी अशा लोकांशी संपर्क साधतात. यावर्षी लोणावळ्याच्या आंतरभारती बालग्रामच्या मुलांना खाऊ देण्यासाठी संतोष दुंडेलू व उत्तम कांबळे हे दोघे गेले होते,-तर सासवडच्या निराधार केंद्रातील मुलांकडे जयंत शितोळे आणि विलास कुलकर्णी हे खाऊ घेऊन गेले. बाकीचे विद्यार्थी अर्थातच जवळपासच्या गरीब वस्त्या, रुग्णालये अशा ठिकाणी गेले होते. ताराचंद इस्पितळात एका विद्यार्थ्याने एका वृध्द स्त्री रुग्णास मिठाईचा पुडा दिला. त्या बिचारीस कोणी नसावे. ह्या मुलाने मिठाईचा पुडा दिल्यावर वात्सल्याने तिने त्याच्या पाठीवरून हात फिरवला आणि म्हटले, "राजा, तू मोठा साहेब होशील रे!"



## परिस्थितिज्ञान तासिका

अभ्यास सगळेच करतात. चांगले गुणही मिळवतात. मोठे होतात, नोकरी व्यवसायात गुरफटतात. परंतु हे असे गुरफटण्यापूर्वी भोवताली कशाकशाचे जाळे आहे हे त्यांना कळले पाहिजे... म्हणजेच सद्यः परिस्थिती ही कळली पाहिजे, आणि सत्यही कळले पाहिजे. स्वतंत्ररित्या हे कोण शिकवतो ? पण वर्धिनीत मात्र यावर्षी या तासिका सुरू झाल्या आहेत. आठवी व त्यापुढील इयत्तांमधील मुलांना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्याची डॉ. वासुदेव धुंडीराज आगटे यांनी जबाबदारी स्वीकारली आहे.

## प्रचार... प्रसिध्दी इ. इ.

ध्येय सिध्दीस जाण्यासाठी अनेकांचा सहभाग या कामी असायला हवा. अनेक कर्तृत्वसंपन्न, कार्यकुशल लोकांपर्यंत हे काम पोहोचायला हवे आहे. म्हणजेच ध्येय सिध्दीसाठी हवी प्रसिध्दी... लेखांद्वारे व्याख्यानांद्वारे... मुलाखतींद्वारे

या वर्षीचे या दिशेने पडलेली पाऊले.



**लेख — दैनिक सकाळ १३ जून ८४**

''माणूस घडवणारी संस्था — स्व-रूपवर्धिनी''

लेखक — डॉ. सत्यरंजन साठे

**व्याख्याने—**

(१) ज्येष्ठ नागरिक संघ, पुणे
(२) दीनदयाळ शोध संस्था, दिल्ली
(३) एस.एन्.डी.टी. कॉलेज, पुणे
(४) बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे
(५) चिल्डरेन्स ॲकॅडमी माजी विद्यार्थी संघटना, पुणे
(६) टिळक कॉलेज, पुणे
(७) प्रतिष्ठित नागरिकांसमोर-चित्तरंजन वाटिकेत
(८) सेवाकार्य बैठक-मुंबई व सातारा.



**टेलिफोन भवनमधील सत्कार—**

राहुल लाळे हा स्वरूपवर्धिनीचा विद्यार्थी यंदाच्या १०वी शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत आठवा आला. राहुलचे वडील टेलिफोन खात्यात नोकरीस आहेत. तेथील कर्मचारी संघटनेने राहुलचा सत्कार करण्याचे ठरविले. राहुलकडून व त्याच्या वडिलांकडून त्यांना स्वरूपवर्धिनीची माहिती कळली. आणि मग राहुलबरोबर संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. कृ. ल. पटवर्धन यांनाही बोलविण्यात आले. श्री. पटवर्धन यांनी उपस्थितांना वर्धिनीच्या कामाची माहिती सांगितली. पुढील योजनांची माहिती सांगितली. त्यामुळे वर्धिनीला दोन नवीन कार्यकर्ते मिळाले.

**आमचे अन्य, नित्याचे उपक्रम**

- पालक-शिक्षक सुसंवाद सभा
- ग्रंथालय
- अभ्यासिका
- आरोग्य तपासणी व त्यानुसार नंतरचा पाठपुरावा (औषधे, शस्त्रक्रिया इ.)
- पूरक आहार
- वाढदिवस शुभेच्छा
- मानसिक विकास विचार बैठक
- व्यक्तिगत संपर्क
- चौथीचा संस्कार वर्ग

# अखेर ही सारी धडपड कोणासाठी? कशासाठी?

१९८४ साली आम्ही करू शकलेल्या कामाचा आढावा आपण वाचलाच आहे. या कामाची थोडीशी कल्पना त्यावरून आपल्याला आली असेल. पण अखेर ही सारी धडपड कोणासाठी ? कशासाठी ? यातून आम्हाला निर्माण तरी काय करायचे आहे ? केवळ उत्तम गुण मिळवू शकणारे कुशाग्र विद्यार्थी ? होय ते तर हवेच. कारण त्याशिवाय व्यवहारी जगात किंमत नाही. पण केवळ त्याच गोष्टींचे झापड बांधणे समाजहिताचे नाही. सगळा समाज सुखी करायचा असेल तर बुध्दीमत्तेला सामाजिक बांधिलकीची जोड दिली पाहिजे. योग्य, संस्कारक्षम वयातच समाजाविषयी आपुलकी निर्माण होईल असे संस्कार आग्रहाने घडवायला हवे आहेत. तरच समाजाच्या हिताचा विचार करणाऱ्यांची संख्या वाढेल. आम्ही त्याच दिशेने वाटचाल करीत आहोत. या वर्षी प्रगतीची दोन पावले तर नक्कीच पडली आहेत. ती कशी ?

(१) या वर्षात दोन तरुण पूर्णवेळ कार्यकर्ते संस्थेचे काम करायला लागले.

(२) शालेय जीवनातून महाविद्यालयीन वातावरणात प्रवेश केलेले येथील संस्कारक्षम विद्यार्थी आता इतर गरजू विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे सहाय्य (अभ्यासाचे मार्गदर्शन इ.) करू लागले आहेत.

(३) संस्थेच्या वार्षिक उत्सवाच्या सर्व जबाबदाऱ्या या वेळेस विद्यार्थ्यांनी स्वीकारल्या आणि यशस्वी करून दाखविल्या.

(४) संस्थेसाठी स्वतःला मिळालेल्या पैशातील हिस्सा आपणहून देण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे.



# पाल्य-पालक-परिसर...प्रतिक्रिया

आमच्याविषयी आम्हीच सर्वकाही सांगणे इष्ट नाही. काही वेळा थोडंसं अधिक सांगण्याचा धोका तर कधी सांगण्याच्या नादात महत्त्वाचेच राहून जायचा धोका. म्हणून हे सदर. पाल्य, पालक परिसर सर्वांशीच आमची आपुलकी कारण या सर्वांच्या सहकार्यावरच, प्रतिसादावरच या कामाचे यश अवलंबून आहे. सोबत काही प्रतिक्रिया आहेत त्यांचे आमच्याविषयी मत सांगणाऱ्या आणि अर्थातच अधिक बोलक्या...

रवींद्रनाथ टागोरांनी ज्याप्रमाणे शांतीनिकेतनचे रोपटे लावले व त्याचा मोठा वृक्ष झाला, तसे अनेक छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांनी लावलेले स्वरूपवर्धिनीचे रोपटे आता खूपच मोठे होऊ लागले आहे. मधूर फुलाफळांनी बहरू लागले आहे. बऱ्याचवेळेला पालकांच्या व्यसनाचा किंवा वागण्याचा मुलांच्या मनावर वाईट परिणाम होत असतो. यामुळे बरीच मुलं आयुष्यात मागे पडतात, दुःखी होतात. मुलांची शारीरीक मानसीक व बौध्दिक वाढ करणे व ती करत असताना येणाऱ्या सर्व प्रकारच्या अडचणी दूर करून मुलांना प्रगतीपथावर नेणे हे तर स्वरूपवर्धिनी आद्य कर्तव्य मानते.

माझा मुलगा येथे गेली ५ वर्षे येत आहे. या संस्थेत जाण्यापूर्वी माझा मुलगा खूपच बुजरा व घाबरट होता. मात्र तो अभ्यासात, खेळत व धीटपणात तो खूपच पुढे आला आहे असा माझा अनुभव आहे. तसेच त्याची शारीरिक प्रकृतीही बरी आहे. अनेक कारणांमुळे माझ्या मुलालाच काय पण इतर मुलांनाही स्वरूपवर्धिनीची आईच्या ओढीसारखी ओढ लागली आहे. स्वरूपवर्धिनीत गेल्याशिवाय माझ्या मुलाला चैनच पडत नाही. त्याचा चांगला वातावरणात वेळही चांगला जातो.

आईवडीलांना भेडसावणारा मुलांचा प्रश्न स्वरूपवर्धिनीने सोडविल्याबद्दल धन्यवाद द्यावेसे वाटतात. अशीच मुलींसाठीसुध्दा स्वरूपवर्धिनी निघावी. चिखलात उगवणाऱ्या कमळांना पाहून धन्य वाटते व त्यांचा जगाला काहीतरी उपयोग व्हावा हीच सदिच्छा आहे.

सौ. नंदा माने



Space Donated By

**M/S ADEPT RECORDING INSTRUMENTS PVT. LTD.**

24/1, Karve Road, Near Bank Of Maharashtra, Pune 411004

माझे नाव—महंमद मिया राजमहंमद शेख. बैलांना नाल ठोकणे हा व्यवसाय मी करतो त्याला ३० वर्षे झाली.

रवींद्रनाथ टागोर विद्यालयाच्या दारात १० वर्षे व्यवसाय करीत आहे. स्व-रूपवर्धनी ही संस्था सुमारे येथे ६ वर्षे चालू आहे. येथील शिक्षक व विद्यार्थी ह्यांची गाठ भेट रविवारी होते. येथील विद्यार्थी कोणालाही त्रास देत नाही. उलट यांची शिस्त पाहून मला आनंदच मिळतो. येथे मुलांना चांगल्या सवयी लागतात चांगले वळण लागते. मी काही वेळा बघतो तेव्हा मुले आपापला खेळ खेळत असतात. ते बघून मला आनंदच होतो म्हणून ह्या संस्थेला माझ्याकडून जर काही अर्थिक मदत लागली तर मी देईन शिवाय मी ज्या गल्लीत राहातो तेथील मुलांना स्वरूप वर्धिनीत येण्यास सांगेन व त्या मुलांना स्वतःही घेऊन येण्याचा माझा विचार आहे. या कामाला जेव्हा जागेची अडचण होती त्यावेळी मी जागेविषयी येथील प्रमुखांना सुचवले होते. येथे येणारी बहुतेक मुले आजूबाजूला रहाणारी आहेत.

मुलांना चांगले वळण लागण्यासाठी आवश्यक असणारी मदत करण्यास मी तयार आहे.

**या चांगल्या कामास माझ्या शुभेच्छा.**

महमदमीया राजमहमद शेख




**Space Donated By**
**A WELL WISHER**

# आजच्या आर्थिक स्थितीकडे


# एक दृष्टीक्षेप

# उद्याच्या उपक्रमांकडे






संस्थेची सरकार दरबारी रीतसर नोंदणी झाली असून आयकराच्या ऐंशी-जी (80-G) या कलमाद्वारे संस्थेस आयकरात सवलतही प्राप्त आहे. येथील विद्यार्थ्यांचा आर्थिक स्तर लक्षात घेता दरमहा फक्त पन्नास पैसे शुल्क घेतले जाते संस्थेचा खर्च सध्या दरवर्षी साठ ते सत्तर हजार रुपये होतो. अर्थात ही सारी रक्कम उदार अंतःकरणाच्या दानशूर व्यक्ति व संस्था यांच्या साहाय्यानेच उभी रहाते. संस्थेने नुकताच एक ५६०० चौ. फुटांचा मोकळा भूखंड विकत घेतला असून या भूखंडाची खरेदी, त्यावरील इमारत, शालोपयोगी साहित्य, फर्निचर यासाठी सुमारे पंचवीस लाख रुपयांचा निधी संस्थेला उभा करायचा आहे. या इमारतीचा उपयोग समाजोपयोगी कामांसाठी जास्तीत जास्त वेळ व्हावा अशा काही योजना डोळ्यांसमोर आहेत. सध्या चालू आहे असा सकाळी व संध्याकाळी शिक्षण उपक्रम, समृध्द ग्रंथालय, अभ्यासिका, व्यायामशाळा, लघु उद्योग केंद्र, आरोग्य सेवा योजना, बध्दीस चालना देतील अशा आकर्षक खेळांचे दालन आणि व्यसनमुक्ती आंदोलन हे त्यापैकीच काही उपक्रम.




## साथी हाथ बढाना



एके काळी विकासाच्या आणि वैभवाच्या शिखरावर असलेला आमचा देश आज 'विकसनशील देश' म्हणून जगभर मिरवतोय ह्याची वेदना आम्हाला आहे आणि अर्थातच तुम्हालाही. हे बदलले पाहिजे, ही स्थिती पालटली पाहिजे हीच आपल्या प्रत्येकाची इच्छा आहे. इच्छा निश्चितच चांगली आहे पण त्या पूर्ततेसाठी आवश्यकता आहे प्रामाणिक प्रयत्नांची... ते ही योग्य दिशेने... योग्य रीतीने.

आम्ही तेच करतोय. आज छोट्याशा रूपात दिसणारे आमचे काम उद्याचा राष्ट्रीय प्रकल्प बनणार आहे हे स्वप्न लवकरात लवकर सत्यात आणण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आवश्यकता आहे आपल्या सहकार्याची. हे सहकार्य आपण अनेक प्रकारे करू शकाल. काही नवीन, उपक्रम आणि व्यवहार्य कल्पना सुचवून प्रत्यक्ष कामात सहभागी होऊन, अनेक गुणी माणसांपर्यंत आम्हाला पोहोचवून, योग्यवेळी आपल्या अधिकाराचा या कामी योग्य उपयोग करून... आणि यापैकी काहीच न करता आले तर किमान पैशाच्या अगर उपयुक्त वस्तूंच्या रूपात सहाय्य करून कारण अन्य सहाय्याइतकेच आर्थिक सहाय्यही मोलाचे आहे.



# मुकुटातील एक पीस गळाले...


गुणी, संवेदनाशील कर्तृत्ववान मुले वर्धिनीच्या मुकुटातील पिसे. त्यांच्या विकसित होणाऱ्या गुणांमुळे हे काम चांगल्याप्रकारे प्रगती करीत आहे. रोज काहीतरी चांगला अनुभव येतो त्यामुळे कार्यकर्ते तर कधी कधी विचार करतात खरंच दिवसाचे अठ्ठेचाळीस तास असले तर किती बरं झालं असतं!

पऽऽण तो दिवस उजाडला... शनिवार १७ नोव्हेंबर ८४ बलदंड बनण्यासाठी सकाळी व्यायामाला जाणारा आमचा संतोष दुंडेलू नेहमीप्रमाणे व्यायामाला बाहेर पडला आणि अचानक हृदयक्रिया बंद पडून... कोणालाही न सांगता... हे विश्व सोडून गेला. अकस्मात वर्धिनीच्या मुकुटातील एक पीस गळून पडले. पिकले पान गळाले तर झाडाला फारसे दुःख होत नसेल, पण त्याच्यामध्ये वादळ पेलण्याची ताकद असते असे रसरशीत ताजेपान गळाले तर मात्र झाडाला किती वेदना होत असतील याचाच हा अनुभव होता. त्याच्या आत्म्यास शांती मिळो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.



# आता यांचे स्मरण तेवढे शक्य आहे!

दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी
दिवंगत उपपंतप्रधान श्रीयुत यशवंतराव चव्हाण
आणि भोपाळ वायू दुर्घटनेतील हजारो दुर्दैवी बांधव




# •• प्रार्थना



नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ॥


हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरती ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥ १ ॥



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
अम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या अम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥ २ ॥



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीहि तेजास्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती- ध्यास हा ॥ ३ ॥



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणू रेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥ ४ ॥

**सन्माननीय सभासद**

* श्री. फाझलअल्ली फाझलभॉय
सामाजिक कार्यकर्ते

श्री. जयसिंगभाई मरिवाला
उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते

डॉ. मा. सु. पवार
माजी उपकुलगुरू
म. फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी.

श्री. प्रतापराव पवार
उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते

श्री. अविनाश वारदेकर
उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते

**कार्यकारी मंडळ**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : श्री. पु. व. श्रॉफ, उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते |
| उपाध्यक्ष | : श्री. अ. न. गोगावले, कॉंट्रॅक्टर व सामाजिक कार्यकर्ते |
| कार्याध्यक्ष | : श्री. कृ. ल. पटवर्धन निवृत्त मुख्याध्यापक |
| उप. कार्याध्यक्ष | : श्री. व. ना. दाते निवृत्त सरकारी अधिकारी |
| कार्यवाह | : श्री. रा. प. देसाई निवृत्त सरकारी अधिकारी |
| सहकार्यवाह | : श्री. शि. रा. पटवर्धन सामाजिक कार्यकर्ते |
| खजिनदार | : श्री. श्री. शं. सामळ सिव्हिल इंजिनियर व कॉंट्रॅक्टर |
| सभासद | : श्री. वा. दे. संचेती, व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते; श्री. कां. गि. शहा, शेती व उद्योगपती; श्री. कृ. गो. लवळेकर मुख्याध्यापक; श्रीमती उषःप्रभा देसाई प्राध्यापक व चार्टर्ड अकौंटंट; श्रीमती कुंतला मुजुमदार सामाजिक कार्यकर्त्या |

**संपर्क**

कार्याध्यक्ष
श्री. कृ. ल. पटवर्धन
४२८/२० शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
फोन : ५५८३५

किंवा श्री. रा. प. देसाई
कार्यवाह
फोन : ६४३७५

किंवा
श्रीमती कुंतला मुजुमदार
फोन : ५३६०६